# वाटचाल आरोग्य अधिकाराची



# वाटचाल आरोग्य अधिकाराची

## (आरोग्य अधिकार-प्रशिक्षण मार्गदर्शिका)

**लेखन**

डॉ. अनंत फडके

डॉ. अभय शुक्ला

डॉ. धनंजय काकडे

प्रशांत खुंटे

रेणुका मुकादम

भाग्यश्री खैरे

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

**प्रकाशक :**

**साथी**

फ्लॅट नं. ३ व ४, अमन (ई) टेरेस सोसायटी,
डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०२९
**फोन :** (०२०) २५४५१४१३ / २५४५२३२५
**फॅक्स :** (०२०) २५४५१४१३
**E-mail :** cehatpun@vsnl.com
**Website:** WWW.sathicehat.org

**पहिली आवृत्ती** : ८ मार्च २०१०, स्त्री मुक्ती दिन, शताब्दी

**मुद्रक :** एन.आर. प्रिंटर्स, पुणे

**देणगी मूल्य** : रु. ४०/-

*या पुस्तिकेवर कोणाचाही कॉपी राईट नाही. मोकळेपणाने कोणीही या माहितीचा उपयोग करून घ्यावा. लोकशिक्षणासाठी व ना नफा ना तोटा तत्त्वावर पुस्तिका वापरल्यास परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. पुस्तिकेबद्दलचा आपला अभिप्राय व पुस्तिकेचा आपण केलेला उपयोग मात्र आम्हाला जरूर कळवावा.*

# प्रस्तावना

आरोग्याचे काम करायचे म्हणजे लोकांना आरोग्यसेवा पुरवायची असाच बराचसा समज असतो; कारण गेल्या ५० वर्षात भारतात आरोग्याबाबत जे सामाजिक कार्य झाले आहे ते बहुतांशी गोर-गरिबांना, इतर गरजूंना आरोग्य-सेवा पुरवणे या स्वरूपाचे आहे. निरनिराळ्या धार्मिक व धर्मवादी संस्था-संघटना, गांधीवादी कार्यकर्ते, मानवतावादी समाजसुधारक किंवा सेवाभावी डॉक्टर्स या सर्वांच्या कामामुळे आरोग्याचे काम म्हणजे आरोग्य-सेवा पुरवण्याचे काम असे चित्र जनमानसात तयार झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'आरोग्यसेवा हा हक्क आहे' या भूमिकेतून काही संघटना, संस्था एक नवी परंपरा रुजवत आहेत. त्यापैकी साथी-सेहत एक आहे. रस्ते, वीज, पाणी, सार्वजनिक स्वच्छता इत्यादी सेवा आधुनिक जीवनात मूलभूत नागरी सुविधा म्हणून विसाव्या शतकात मानल्या गेल्या. आता एकविसाव्या शतकात प्राथमिक शिक्षण, आरोग्य-सेवा याही सेवा विकसित देशांप्रमाणे भारतातही मूलभूत सुविधा म्हणून सर्व नागरिकांना मोफत मिळायला हव्या अशी आमची भूमिका आहे. आरोग्य, आरोग्य-सेवा हे मानवी अधिकार आहेत हे जगभरचे वेगवेगळे तज्ज्ञ, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संघटना यांनीही वारंवार मांडले आहे. हा मानवी अधिकार प्रत्यक्षात आणण्यासाठी जनमत जागृत करायचे काम अनेक संस्था-संघटना गेली काही वर्षे भारतात करत आहेत. त्याचाच साथी-सेहत एक भाग आहे. महाराष्ट्र व मध्यप्रदेशमधील काही समविचारी संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांची 'आरोग्य-हक्क' या विषयावर 'साथी-सेहत'ने २००५-०७ या काळात प्रशिक्षणे घेतली. या प्रशिक्षणासाठी बनवलेल्या टिपणांमध्ये सुधारणा करून, ती अद्ययावत करून प्रस्तुत पुस्तक बनवले आहे. आरोग्य-हक्क, हक्काधारित दृष्टिकोन या संकल्पनांबाबत नेमकी, स्पष्ट कल्पना कार्यकर्त्यांना, वाचकाला यावी व या स्पष्टतेच्या आधारे आरोग्य-हक्कांबाबत प्रशिक्षण करण्यासाठी ठोस दिशा मिळावी हा उद्देश या छोट्या पुस्तिके मागे आहे.

ही प्रस्तुत पुस्तिका अनेकांच्या प्रयत्नातून साकारली आहे. आरोग्य हक्कांसाठीचे काम करतांना आपले दूर पल्ल्याचे उद्दिष्ट काय असले पाहिजे, व त्याचा आजच्या कामाशी संबंध कसा जोडला पाहिजे, याबद्दल माझे सहकारी डॉ. अभय शुक्ला यांच्यासोबत वारंवार खोलात चर्चा झाल्या. हक्काधारित दृष्टिकोन व आरोग्य हक्क याबाबत अनेक ठिकाणी जी मांडणी होते त्यात काहीतरी कमतरता आहेत असे आम्हाला जाणवत होते. या कमतरता नेमक्या काय आहेत याबद्दल स्पष्टता येण्यासाठी आमच्यात वेळोवेळी ज्या चर्चा झाल्या त्यातून आम्ही करत असलेल्या आरोग्य-हक्क प्रशिक्षणाची वैचारिक बैठक आकारत गेली.

या पुस्तिकेचा पहिला मसुदा २००५ मध्ये बनवतांना साथी-सेहतच्या आमच्या ज्या सहकाऱ्यांनी योगदान दिले त्या सहलेखकांची नावे पहिल्या पानावर आहेतच. त्यानंतर शकुंतला भालेराव, शैलेश डिखळे, तृप्ती जोशी, डॉ. नितीन जाधव या आमच्या नव्या दमाच्या सहकार्यांनी या पुस्तिकेसाठी

सूचना, मजकुरात सुधारणा यासाठी योगदान दिले. डॉ. निलांगी सरदेशपांडे यांनी अंतिम मसुदा काळजीपूर्वक वाचून नेमक्या सुधारणा सुचविल्या. साथी-सेहतचे प्रशासकीय काम सांभाळणाऱ्या सर्व सहकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे मनःपूर्वक साथ दिल्यामुळे आरोग्य-हक्काचे व या पुस्तिकेचे काम पुढे जाऊ शकले.

ज्यांना आरोग्य-हक्क प्रशिक्षण देण्यासाठी ही पुस्तिका बनवली ते आमच्या सहकारी संस्थांतील कार्यकर्ते आहेत- आम्ही आमच्या आरोग्यासाठी, खोज, अपेक्षा होमिओ सोसायटी, लोकसमन्वय प्रतिष्ठान, मानवलोक इत्यादी संस्थांतील कार्यकर्त्यांनी आम्हाला सकारात्मक प्रतिसाद दिला; आमच्या प्रशिक्षणाबद्दल, प्रशिक्षण साहित्याबद्दल मनमोकळ्या प्रतिक्रिया दिल्या. त्यामुळे आम्हाला आमच्या प्रशिक्षणात व प्रशिक्षण साहित्यात सुधारणा करणे शक्य झाले. या सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार. या प्रशिक्षण-शिबिरांचा अनुभव लक्षात घेऊन आम्ही असे ठरवले की प्रश्नोत्तरे या स्वरूपात मुख्यतः प्रशिक्षण साहित्य बनवावे. त्यामुळे प्रस्तुत पुस्तिका ही मुख्यतः 'प्रश्नोत्तरी' या स्वरूपात आहे. त्याला जोड म्हणून परिशिष्टांमध्ये थोडक्यात कळीचे मुद्दे व काही उपयुक्त माहितीचा समावेश केला आहे. मुद्यांच्या रूपातील काही परिशिष्टे प्रशिक्षण शिबिरे घेतांना वापरायचे साहित्य या पद्धतीने वापरता येतील.

पुस्तिकेच्या प्रस्तुत मसुद्याचे डी. टी. पी.चे काम गजानन लोंढे, रविंद्र मांडेकर, शारदा महल्ले यांनी नेहमीच्या सहकार्याच्या भावनेने, चांगला दर्जा राखत वेळेत करून दिले. छपाईचे काम एन. आर. प्रिंटर्स यांनी वेळेवर करून दिले. याबद्दल या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहेत.

या पुस्तिकेचा आरोग्य-हक्क चळवळीत काम करण्यासाठी कार्यकर्त्यांना विशेषतः प्रशिक्षणासाठी उपयोग होईल अशी आशा आहे. पुढील आवृत्तीत सुधारणा करण्यासाठी केलेल्या सूचनांचे मनःपूर्वक स्वागत आहे.

८ मार्च, २०१० — डॉ. अनंत फडके
स्त्री मुक्ती दिन, शताब्दी — साथी-सेहत

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

प्रकरण १- आरोग्य चळवळ बांधण्यासाठी ‘हक्काधारित दृष्टिकोन’ ............ ६

प्रकरण २- प्रश्नोत्तरे- आरोग्य अधिकाराची ........................................ १४

परिशिष्टे

१. महाराष्ट्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था (२००४) ..........................५१

२. प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधांची तीव्र टंचाई चालूच! ....................५२

३. आवश्यक आरोग्य सेवेसाठी सरकारकडे पैसे नाहीत? ..................................५३

४. रुग्ण-डॉक्टर संबंधातील हक्क व जबाबदाऱ्या ..........................................५४

५. जन-स्वास्थ्य अभियानची आरोग्य-हक्क मोहीम ..........................................६२

६. रेबीज व पोलिओ लसीकरणाची शोकांतिका ............................................६७

७. ‘राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान’ अंतर्गत महाराष्ट्रातील ’लोकाधारित देखरेख प्रक्रिया’ .......................................................६९

८. आरोग्य सेवाच्या हक्कांकरिता जनसुनवाई ...............................................७५

९. मानवी हक्क - संकल्पना ..................................................................७७

१०. जागतिकीकरणाच्या नव्या काळात हक्काधारित चळवळींची गरज ......................८०

११. समाज, स्त्रियांचे आरोग्य व आरोग्य-सेवा यंत्रणा .......................................८२

१२. मानवी गरजा, भांडवली हक्क, मानवी हक्क ............................................८५

१३. विविध आंतरराष्ट्रीय घोषणा/करारातील आरोग्यविषयक कलमे ........................८७

१४. भारतातील संविधान व न्यायालयांचे निर्णय यांचे आरोग्य हक्कांना समर्थन ...........९१